महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६१० दि. १४/१०/२०२०

**विषय : कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचारांकरीता वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूरकरण्याच्या अधिकारामधील सुधारणांबाबत.**

**संदर्भ: १. स.स्था. आ.क्र.३७७ दि. ३०.०८.१९५८ चे सुधार पत्र क्र. १२ दि. १२.०२.१९९८.**
**२. प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९, दि. १९.०५.२००६.**
**३. सा. आ. क्र. २० (क) दि. १७.०६.१९६३.**
**४. प्रशासकीय परिपत्रक क्र. २७२, दि. ३०.१२.२००९.**

कामावर असताना कर्मचाऱ्यास अपघात झाल्यास त्यावर तात्काळ वैद्यकीय उपचार सुरु करता यावेत यासाठी स. स्था.आ. क्र. ३७७ दि. ३०.०८.१९५८ चे सुधार पत्र क्र. १२ दि.१२.०२.१९९८ अन्वये तात्पुरती अग्रीम रक्कम मंजूर करण्याचे अधिकार क्षेत्रिय कार्यालयातील अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत. तसेच सदर उपचारापोटी झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्याबाबतचे अधिकार प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि. १९.०५.२००६ अन्वये सुधारित करण्यात आलेले आहेत.

२. वैद्यकीय उपचारापोटी देण्यात आलेली अग्रीम रक्कम तसेच होणाऱ्या खर्चाचे विश्लेषण करुन अशा प्रकरणांना मंजूरी देण्याकरीता प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांमध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता. त्यास अनुसरुन आता अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त) आणि संचालक (मासं) यांच्याशी विचार विनिमय करुन कामावर असताना अपघात झाल्यास उपचारासाठी झालेल्या खर्चाची वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर करण्यासाठी असलेले मंजूरीचे अधिकार खालील प्रमाणे सुधारित करण्यासाठी मंजुरी दिली आहे.

| अ. क्र. | कामावर असताना अपघात झाल्यास वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्यासाठीची रक्कम | वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्तीकरीता मंजुरीसाठी सक्षम अधिकारी | |
|---|---|---|---|
| १ | रु.२०,०००/-किंवा त्या पेक्षा कमी रक्कमेची प्रकरणे | संबंधीत मंडलाचे अधीक्षक अभियंता-व्यवस्थापक (मासं) व व्यवस्थापक (विवले) यांचेशी विचारविनिमय करुन. | बदल नाही |
| २ | रु.२०,००१/-ते रु.३०,०००/- पर्यंतच्या रक्कमेची प्रकरणे | संबंधीत परिमंडलाच मुख्य अभियंता - सहा.महाव्यवस्थापक(मासं) व वरिष्ट व्यवस्थापक (विवले) यांचेशी विचार विनिमय करुन. | बदल नाही |
| ३ | रु.३०,००१/-ते रु.७,००,०००/- पर्यंतच्या रक्कमेची प्रकरणे | **संचालक (मासं) हे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी व मुख्य महाव्यवस्थापक (सांघिक लेखा) यांच्याशी विचार विनिमय करुन** | |
| ४ | रु.७,००,०००/- व त्या पेक्षा अधिक रक्कमेची प्रकरणे | **संचालक (वित्त) हे संचालक (मासं) व मुख्य महाव्यवस्थापक (सांघिक लेखा) यांच्याशी विचार विनिमय करुन** | |

**टीप : रु. ७,००,०००/- च्या वरील रकमेच्या प्रतिपूर्ती बाबतच्या प्रकरणात वैद्यकीय सल्लागार व संबंधीत परिमंडळातील उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी व्यक्तीश: प्रकरणाचा अभ्यास करुन त्यांनी अहवाल सादर करणे आवश्यक आहे.**

३. अपघात झालेल्या कर्मचाऱ्यास मान्यताप्राप्त रुग्णालया व्यतिरिक्त इतर रुग्णालयामध्ये उपचार करण्यासाठी तातडीने दाखल केले असल्यास अशा कर्मचाऱ्यांस तीन दिवसाच्या कालावधीत कंपनीने मान्यता दिलेल्या रुग्णालयात दाखल करण्यात यावे. तसेच रुग्णालयात दाखल करतांना प्रशासकीय परिपत्रक क्र. ३१ दि. २९.०३.२००६ नुसार राहण्याच्या खोलीबाबत (Room) केलेल्या वर्गीकरणाबाबतच्या तरतूदींचे पालन करावे.

४. स.स्था.आ.क्र. ३७७ दि. ३०.०८.१९५८ चे सुधार पत्र क्र. १२ दि. १२.०२.१९९८ आणि प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि. १९.०५.२००६ मध्ये तदनुषंगाने अंशत: बदल करण्यात येत आहे.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केलेल्या तारखेपासून अंमलात येईल.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या Employee Portal e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)**(से.नि.)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**